दै. पुण्यनगरी दि 11-02-2023

# भाग्यनगर ठाण्याच्या हद्दीमधील दरोड्यातील आरोपींना लिंबगाव पोलिसांनी केले अटक..!



**नांदेड/प्रतिनिधी**

शहरातील वेदांतनगरमध्ये शर्मा कुटुंबीय राहत होते. यांच्याकडे काही दिवसांपुर्वी राजस्थानी लोकांनी काम केले होते. त्यावेळी त्यांनी घराची रेकी केली होती. घरात एकटी महिला आहे. तसेच दागदागीनेही खूप आहेत, हे हेरुन दोन महिन्यांपासून या दरोड्याची तयारी केली. प्रत्यक्षात १० फेब्रुवारी रोजी सकाळी दरोडा टाकताना योजना फिस्कटली. या महिलेच्या गळ्याला चाकू लावून गंठण काढताना महिलेने आरडाओरड केली. त्यामुळे हे आरोपी पसार झाले. या बाबतची माहिती भाग्यनगर पोलिसांना उशीरा मिळाली. त्याआधी लिंबगाव पोलिसांना ही माहिती मिळाली. लिंबगाव पोलीसांनी घटनास्थळी जाऊन आरोपी घराबाहेर पडण्याच्या आधीच त्यांना ताब्यात घेतले.

ही घटना घडल्यानंतर भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तेथे पोहचले. घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी या आरोपींना ताब्यात घेऊन भाग्यनगर पोलीस ठाण्यात आणले. या गुन्ह्याची कबुली घेण्यात आली. दरोड्याच्या घटनेनंतर कॉम्प्लेक्समध्ये आरडाओरड झाल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. योग्य वेळी लिंबगाव पोलीस घटनास्थळी आले आणि पुढील मोठा अनर्थ टळला. (पान २ वर..)

वरुन)

## भाग्यनगर ठाण्याच्या...

१० फेब्रुवारी रोजी सकाळी १०.४५ वाजता ११२ वर वेदांतनगर, मालेगाव रोड नांदेड येथून माहिती मिळाली. सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास एका महिलेच्या घरामध्ये तीन चोरट्यांनी प्रवेश करून तिला जिवे मारण्याची धमकी दिली. चाकुचा धाक दाखवून सोन्याचे मंगळसूत्र जबरीने चोरून नेत असताना फिर्यादीने ११२ वर संपर्क केल्यामुळे भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोहेकॉ शिवराज गोणारकर, पो.ना. बोरकर यांनी प्रतीसाद देवून घटनास्थळ गाठले. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिक्षक सिध्देश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीच्या शोधात असलेले सपोनि चंद्रकांत पवार, पोहेकॉ वाणी, पोकॉ मुंजाजी, लिंबगावचे पोउपनि गोटके, हाके, पो.हे.कॉ. दत्तराम जाधव, पो.कॉ. शरदचंद्र चावरे, मनोज परदेशी, रमेश सूर्यवंशी, बालाजी कदम, पोस्टे वजिराबाद यांना सदर घटनेची माहिती मिळताच त्यांनी या भागामध्ये आरोपीचा शोध घेण्यास सुरूवात केली. आरोपीचा शोध घेत असताना तीन संशयीत इसम मिळुन आले. त्यांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून सोन्याचे मंगळसुत्र, पेंडॉल यासह धारदार चाकू त्यांच्याकडे मिळुन आले. चोरट्यांनी वेदांतनगर भागामध्ये चोरी केली असल्याचे सांगितले. त्यांच्याकडे अधिक विचारणा करता सदर चोरी करताना आजुबाजुस वॉच करणारे त्यांचे ईतर दोन साथीदार यांचेबाबत माहिती दिली. त्यावरून त्यांना ताब्यात घेण्यात आले. प्रदिप शंकरलाल स्वामी (१९,व्यवसाय फरसीचे काम), पवनकुमार पि. रामुराम जाठ (२४, व्यवसाय फरशीकाम), राजेंद्रकुमार सुरेशकुमार जाठ (२४, व्यवसाय फरशीकाम), पंकज शंकरलाल स्वामी (२१, व्यवसाय फरशीकाम), मनिष नेमीचंद सेन (२१, वर्षे व्यवसाय फरशीकाम) सर्व ग्रा. नौसल तहसील दाताराम गड जि. सिकर, राजस्थान) यांच्याकडुन सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेले ८० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र पेंडॉलसह व गुन्ह्यात वापरलेले हत्यार चाकु हस्तगत करण्यात आले आहे. या प्रकरणात भाग्यनगर पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विजयकुमार कांबळे अधिक तपास करीत आहेत.

दै. पुण्यनगरी दि. 11-2-2023

# गोळ्या झाडणारे दोघे गजाआड

**नांदेड / प्रतिनिधी**

क्षुल्लक कारणावरुन गोळ्या झाडून मित्राला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणात पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. गुरुवारी रात्री झालेल्या गोळीबाराने शहर हादरले होते. पोलिसांवर टीकेची झोड उठविण्यात आली होती.

शहरातील नई आबादी मगदूमनगरमधील रहिवासी शेख इरफान शेख गुड्डू (२५), संतोष लक्ष्मण कर्नेवाड रा.वसंतनगर नांदेड व हरजितसिंघ उर्फ जितू लखविंदरसिंघ पन्नू रा.गोविंदनगर हे ९ फेब्रुवारी रोजी रात्री वसंतनगर नांदेड भागात गोळा झाले होते. त्यावेळी शेख याचा संतोष व हरजितसिंघसोबत वाद झाला आणि संतोषने आपल्याकडील गावठी पिस्टलमधून शेख याच्यावर गोळ्या झाडल्या. या घटनेत शेख इरफान हा गंभीर जखमी झाला. त्यानंतर आरोपी फरार झाले. या घटनेने एकच खळबळ उडाली. शेख इरफानला गोळ्या झाडून जिवे मारण्याचा प्रयत्न झाल्याने व गोळीबाजर झाल्याने पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेवर टीकेची झोड उठविण्यात आली. तसेच शहरात दहशतही निर्माण झाली. ही घटना कळताच वरिष्ठ पोलिस अधिकारी गुरुवारी रात्री घटनास्थळी गेले त्यांनी पाहणी केली. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या शेख इरफानला विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी विमानतळ पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आरोपींच्या शोधाचे आदेश दिले. शेख इरफानचे वडिल शेख घुड्डु शेख इस्तगीर मगदूमनगर नई आबादी नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विमानतळ पोलिस ठाण्यात गुरनं ४८/२३ कलम ३०७, ३४, सह कलम ३/२५ दाखल करण्यात आला आहे. पोलिस व स्थागुशा पथकाने (पान २ वर..)

## गोळ्या झाडणारे...

संतोष कर्नेवाड व हरजितसिंघ पन्नू या दोघांनाही अटक केली त्यांना विमानतळ पोलिसांच्या हवाली केले.पोलिस अधीक्ष श्रीकृष्ण कोकाटे,अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे भोक यांच्या मार्गदर्शनात स्थागुशाचे पोलिस निरीक्षक द्वारकादा चिखलीकर, सपोनि पांडुरंग माने, उपनिरीक्षक सचिन सोनव पोकॉ तानाजी येळगे, मोतीराम पवार, बालाजी यादगीरवाड, चाल हेमंत बिचकेवार यांनी ही कारवाई केली.